# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in


पत्र

विषयः- **Construction & laying of 220 KV Double Circuit transmission line by making LILO on 220KV Uran Apta line No.4 At Tower location No.30 Substation at SEZ area bearing Survey No.143,142&144 At Sai Village Tal-Panvel**

जावक क्र. ब/20/जमिन/ 3८99 /2019-20.
अलिबाग- 402 201, दिनांकः- 1० /12/2019.

प्रति,

श्री. सर्वोतम एन शेटी,
व्ही.पी. ऑपरेशन एफटीडब्ल्युझेड,
लक्ष्मीपती बालाजी सप्लाय चेन मॅनेजमेंट लि.
302, 3 रा मजला, एफ-ब्लॉक, सीजय हाऊस,
शिव सागर इस्टेट, डॉ. अॅनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई-18

संदर्भः- आपलेकडील पत्र क्र. एएल/एलबीएससीएमएल/इएचव्ही/फॉरेस्ट/साई/04/19-20, दिनांक 21/11/2019.

आपण संदर्भिय पत्रान्वये 220 केव्ही डबल सर्कीट विद्युत वाहिनी टाकणेकरीता वन (संवर्धन), अधिनियम 1980 अंतर्गत वन जमिन मागणी प्रस्ताव या कार्यालयास 1 प्रतीत दाखल केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळुन आल्या आहेत.

1) प्रस्तावाचे अवलोकन केले असता प्रस्तावीत विद्युत वाहीनी ही अस्तित्वांतील 220 केव्ही उरण-आपटा विद्युत वाहिनीस जोडण्यात येणार असल्याचे दिसून येत आहे. तथापी सदर जोडणी ही रानसई येथूनच जोडणे का आवश्यक आहे. तसेच सदर अस्तित्वांतील उरण-आपटा विद्युत वाहिनीस इतर ठीकाणी जोडणी केली तर कीतीतरी प्रमाणात वनेक्षेत्र बाधीत होण्यापासून वाचणार आहे. तसेच सदर उरण-आपटा या विद्युत वाहिनीस जोडण्यात आलेली आहे, त्यामुळे सदर विद्युत वाहिनी साई ते थेट आपटा येथे जोडता आली असती, तर मोठयाप्रमाणात वनक्षेत्र बाधीत होण्यापासून वाचविता येईल तथापी तसे करण्यात आलेले नाही. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) प्रस्तावांत सदर प्रकल्पाबाबत व त्याचे आवश्यकतेबाबत तसेच वनक्षेत्रांतूनच सदर आखणी मार्ग प्रस्तावीत करणेचे प्रयोजन काय याबाबत स्पष्टता व त्याबाबत कारण मिमांसा दर्शविणारी प्रोजेक्ट नोट सामील करणे आवश्यक आहे.

3) प्रस्तावांत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे लाईनवरुन जोड लाईन टाकणेत येणार आहे तरी याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीबरोबत करण्यात आलेलेला करारा वा त्यासंबंधीचे नाहरकत, विद्युतवाहीनी टाकणेकरीता घेणेत आलेली तांत्रीक व प्रशासकीय मान्यत इत्यादी दस्तऐवज प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहेत.

4) प्रस्तावीत लाईन कोणत्या कारणाकरीता टाकणेत येत आहे तसेच संबंधीत प्रकल्पाकरीता घेण्ण्यात आलेल्या याबाबत तांत्रीक मान्यता व प्रशासकीय मान्यता प्रस्तावांत सामील करण्यात याव्यात.

3) प्रस्तावासोबत जोडलेल्या 1:50000या प्रमाणातील टोपोशिट मुळ आकारातील जोडलेल्या नाहीत. टोपोशिटवर नजीकचे कर्नाळा पक्षी अभयारण्य चे संपुर्ण क्षेत्र व त्याचे मंजुर पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) व त्यापासुनचे प्रस्तावित 220 KV लाईनचे अंतर दर्शविणे आवश्यक आहे.

4) मौजे- रानसई ता. उरण या गावाचा गांव नकाशावर दर्शविलेल्या प्रस्तावित आखणी मार्गाप्रमाणे राखीव वन स. नं. 127 मधील 220 KV चे विद्युतलाईनची लांबी 1800 मीटर आहे. क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये दर्शविलेली लांबी 1681.72 मीटर आहे. त्यामुळे मागणी क्षेत्र व लांबी व रुंदी अचुक दर्शविणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावित विद्युत लाईन ही मंजुर Eco-Sensitive Zone चे क्षेत्रातुन जात आहे.

5) मौजे- चिरनेर ता. उरण या गावाचा गांवनकाशावर दर्शविलेल्या प्रस्तावित आखणी मार्गाप्रमाणे राखीव वन स.नं. 168 चे विद्युत लाईनची लांबी क्षेत्र विवरणमध्ये दर्शविलेली बरोबर आहे. परंतु प्रस्तावित लाईनसाठी रुंदी न दर्शविता मागणी क्षेत्र दर्शविलेली आहे. त्यामुळे मागणी क्षेत्राबाबत खात्री करणे शक्य होत नाही. त्यासाठी प्रस्तावित लाईनची रुंदी दर्शविणे आवश्यक आहे. क्षेत्र विवरण तक्त्यात स.नं. 268 दर्शविलेला आहे त्याबाबत दुरस्ती होणे आवश्यक आहे.

6) मौजे- चिरनेर ता. उरण लगत मौजे- हाडांबे हे गांव आहे. त्यागावातील क्षेत्राची मागणी दर्शविलेली नाही. परंतु मौजे- साई ता. पनवेल या गावाचे गांव नकाशात मौजे- हाडांबे गावाचे क्षेत्र दर्शविलेले आहे. त्याप्रमाणे मौजे-हाडांबे जुना राखीव वन स. नं. 'फॉरेस्ट" आहे. परंतु क्षेत्र विवरणामध्ये स. नं. 223 दर्शवुन लांबी 398.76 मीटर क्षेत्र विवरणात दर्शविलेली आहे. परंतु रुंदी दर्शविलेली नसल्यामुळे मागणी क्षेत्राबाबत शहानिशा होत नाही.

7) मौजे- डोलघर ता. पनवेल या गावाचे गांव नकाशावर दर्शविलेल्या प्रस्तावित 220 KV चे आखणी मार्गात बाधीत होणा-या स.नं.77 (जुना मौजे- कर्नाळा स.नं.67 ) , स.नं. 80 ( जुना कर्नाळा स.नं. 70 ) स.नं. 81/1( जुना कर्नाळा स.नं. 71/1) चे क्षेत्राचा वैधानिक दर्जा अंतिम संपादित खाजगी वन आहे. त्याप्रमाणे प्रकल्पयंत्रणेकडुन क्षेत्र विवरण तक्त्यात दुरुस्ती

करणे आवश्यक आहे. स. नं. 79 ची लांबी 325 मी. स. नं. 80 ची लांबी 310 मी. आहे. क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये लांबी जास्त दर्शविलेली आहे.

8) प्रस्तावांतील क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये वनक्षेत्राचा वैधानीक दर्जा पूर्ण म्हणजेच Private Forests, Reserved Forest नमुद करण्यात यावेत. तसेच प्रस्तावांत क्षेत्र विवरण तक्त्यांत आखणी मार्गाची लांबी व रुंदी नमुद करण्यात यावी.

9) प्रस्तावात समाविष्ट आखणी मार्गाप्रमाणे सर्व गावाचे गांव नकाशे Google Image सह पुर्ण आकारातील सादर करणे आवश्यक आहे.

10) प्रस्तावासोबत सर्व गांवनकाशातील वन /वनेत्तर क्षेत्राचे स.नं. च्या 7/12 उतारे मराठी व इंग्रजी मध्ये प्रस्तावामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे.

11) प्रस्तावात जिल्हाधिकारी यांचेकडील वनहक्क कायदा, 2006 अंतर्गत प्रमाणपत्र सामिल असणे आवश्यक आहे.

12) प्रस्तावांत स्वाक्षरीकर्ता हयांना प्राधीकृत केलेबाबत कंपनीचे प्राधीकार पत्र प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

13) प्रस्तावांत आखणी मार्गाचे KML फाईल सीडी मध्ये तयार करुन ती प्रस्तावासमावेत सादर करणेत यावी.

15) प्रस्तावा ऑनलाईन प्रणालीव दाखल करणेत यावा.

16) प्रस्तावांत Cost Benefit analysis प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

वरिलप्रमाणे त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव फेर या कार्यालयास दाखल करावा तसेच सदरचा प्रस्ताव हा ऑनलाईन प्रणालीवर देखील सादर करण्यात यावा. तसेच या प्रकल्पाचे प्रस्तावाचे संच संबंधीत परिक्षेत्र वन अधिकारी, उरण व पनवेल यांना उपलब्ध करुन देण्यात यावेत.

(मनीष कुमार)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल यांचेकडे माहितीसाठी रवाना.

प्रतः- परिक्षेत्र वन अधिकारी, उरण व पनवेल यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी सदर प्रस्तावीत क्षेत्राची स्थळपहाणी करुन त्यांचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच बाधीत होणारे क्षेत्रांत होणारे वृक्षतोडीबाबत देखील विहित कार्यपद्धतीनुसार अहवाल या कार्यालयास सादर करावा.